Vol 6 Issue 3 April 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016



Indian Streams Research Journal

# मुंबई व उपनगरातील घरेलू कामगारांच्या समस्या व उपाय

*प्रा. रेश्मा अणवेकर*
Vikas College of Arts, Commerce & Science Vikhroli Kannamwar Nagar Mumbai.



प्रा. रेश्मा अणवेकर

***प्रस्तावना :–***

स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतामध्ये शहरातील सामाजिक परिस्थिती झपाटयाने बदलत गेली. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांही नोकरी, व्यवसाय करु लागल्या आणि अशा पद्धतीने नोकरदार स्त्रियांचा एक नविन वर्ग तयार झाला. या नोकरदार स्त्रियांना घरातील काम, जबाबदारी सांभाळून कार्यालयातील किंवा कामाच्या ठिकाणची जबाबदारी पार पाडणे अवघड बनत गेले. म्हणून अशा नोकरदार कुटूंबांना घरकाम करण्यासाठी वा मुलांना, वृद्धांना सांभाळण्यासाठी मोलकर्णींची गरज तिव्रतेने भासू लागली. महाराष्ट्रातही शहरीकरणाचा वेग जास्त आहे. महाराष्ट्रात इतर भागांतून विशेषतः दुष्काळी भागातून रोजीरोटीच्या शोधात शहरात येणाऱ्यांचा ओघ वाढतोच आहे. अशा स्थलांतरीत कुटूंबातील स्त्रिया शहरातील नोकरदार महिलांच्या घरी मोलकरीण म्हणून राबत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या अंदाजानूसार महाराष्ट्रात मोलकर्णींची संख्या जवळजवळ सहा लाख इतकी आहे. परंतू ही आकडेवारी काही प्रमाणात वेगळी असू शकते. कारण हया घरकाम करणाऱ्या स्त्रिया असंघटीत क्षेत्रातील आहेत. म्हणून योग्य आकडेवारी मिळणे कठीणच आहे.

व्याख्या :

घरकाम करणाऱ्या कामगारांची विशिष्ट अशी व्याख्या नाही. घरकाम करणाऱ्या कामगारांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

घरेलू कामगार याचा अर्थ असुरक्षित तसेच घरेलू काम करण्याकरीता ठेवण्यात आलेला कामगार असा आहे. घरेलू कामगार यांचे काम हे अंशकालिन किंवा पुर्णकालिन स्वरुपाचे असते व ते एक किंवा एकापेक्षा अधिक मालकांकडे काम करतात. अशी ढोबळमानाने व्याख्या केलेली आहे.




***अ) घरेलू कामाची व्याख्या :***

***महाराष्ट्र घरगुती कामगार कल्याण बोर्ड ॲक्ट नं. 1,2009. :***

''घरगुती काम म्हणजे जसे झाडू मारणे, कपडे धुणे, भांडयांची स्वच्छता करणे, स्वयंपाक बनविणे आणि इतर घरातील काम जे मालक आणि कामगारांच्या परस्पर संमतीने केले जाणारे काम म्हणजे घरगुती काम होय.''

***ब) घरगुती नोकराची व्याख्या :***

***1) दि. हाऊसमेड ॲन्ड डोमेस्टीक सर्व्हट (कन्डीशन ऑफ सर्व्हिस ॲन्ड वेलफेअर) बील.2004, राज्यसभा.:***

''असा कोणतीही व्यक्ती जी त्याच्या उपजिवीकेचे साधन प्राप्त करण्यासाठी नियोकत्याच्या घरातील काम आणि घरगुती कामे करत आहे त्यास घरगुती नोकर म्हणतात.''

**2)डोमॅस्टिक वर्कर रजिस्ट्रेशन,(सोशल सेक्युरिटी ॲन्ड वेलफेअर) ॲक्ट – 2008,एन.सी.डब्ल्यू. ड्राफ्ट बिल:**

''अशी कोणतीही व्यक्ती जी घरकाम करण्यासाठी नियुक्त केलेली आहे, श्रमाच्या मोबदल्यात रोख रक्कम किंवा इतर प्रकारचा मोबदला देवून थेट किंवा कोणत्याही संस्थेकडून आलेली व्यक्ती, तात्पुरत्या कामासाठी किंवा कायम स्वरुपी अथवा अंशीक किवा पुर्णवेळ घरगुती काम करण्यासाठी नेमणूक झाली आहे. त्यास घरगुती नोकर असे म्हणतात. (घरकाम किंवा घरातील इतर सहाय्यक काम म्हणजे जेवण बनविणे, कपडे धूणे, भांडी स्वच्छ करणे, फरशी साफ करणे, झाडू मारणे तसेच घराची काळजी घेणे, मुलांची देखभाल करणे, वृद्ध व आजारी , अपंग व्यक्तींची देखरेख व काळजी घेण्याचे काम).''

**संशोधन विषयाचे समस्यासुत्रण :**

दुसऱ्यांच्या घरात मोलकरणी काम करणाऱ्या स्त्रियांचे काम अंगमेहनतीचे आहे. त्यास समाजात प्रतिष्ठा नाही. त्यामुळे या क्षेत्रात प्रामुख्याने कनिष्ठ सामाजिक स्तरातील स्त्रियांचा भरणा अधिक आहे. तुलनेने हे काम सहजपणे मिळते. थोडयाशा सवयीने अंगवळणी पडते. त्यासाठी विशेष कुशलता आवश्यक नसते. साहजिकच गरीब, निरक्षर व दुसरे काम करु न शकणाऱ्या स्त्रिया आज मोलकरीण म्हणून राबत आहेत. त्यांची कौटूंबिक परिस्थिती फारशी चांगली नाही व कामाच्या ठिकाणीही त्यांना मिळणारी वागणूक उत्साहवर्धक नाही. पैशाच्या मोबदल्यात दुसऱ्यांच्या घरी काम करणे व पैसे देऊन दुसऱ्यांकडून काम करवून घेणे अशा या दोन तीरांच्या मध्ये आकाराला आलेला मोलकरीण व मालकीण यांच्यातील व्यवहाराधिष्ठित असा नवा नातेसंबंध प्रत्येक महानगरीय जीवनाचा अटळ हिस्सा बनत आहे. म्हणून घरेलू कामगारांच्या समस्या व त्यावरील उपाय शोधण्यासाठी मुंबई व उपनगरातील घरेलू कामगारांच्या समस्या व उपाय विषय निवडला आहे.

**अध्ययनाचे महत्व :**

घरामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या श्रमशक्तीचा एक मोठा हिस्सा कामगाराचा दर्जा मिळाल्याविना काम करण्यास मजबूर आहे. कामाच्या निगडीत असलेल्या त्यांच्या अधिकारांच्या सुरक्षेसाठी कोणतेच कायदे नाहीत. आणि जे थोडेबहूत कायदे आहेत ते लागू होत नाहीत. आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (आय.एल.ओ.) च्या अनुसार भारतात उपजिविकेसाठी दुसऱ्यांच्या घरात काम करणाऱ्या महिलांची संख्या १ करोडच्या आसपास आहे. यांची संख्या देशात तेजीने वाढत आहे. एकत्र कुटूंब पद्धती कमी होत आहे. त्याचप्रमाणे एका व्यक्तीच्या उत्पन्नाने घर चालविणे अवघड होत जात आहे. पती पत्नी दोघेही काम करत असल्यामुळे घरकाम करण्यासाठी, मुलांची आणि वृद्ध लोकांची देखभाल करण्यासाठी कुटूंबातील सदस्य उपस्थित नसतात. अशावेळी त्यांची देखभाल करण्यासाठीसुद्धा घरेलू कामगारांना कामावर ठेवण्याची गरज भासत असते. अशाप्रकारचे काम करणारे घरेलू कामगार हे असंघटीत क्षेत्रातील असतात. अशा घरेलू कामगारांना कामगार म्हणून दर्जा मिळावा, त्यांचे अधिकार त्यांना मिळावे, त्यांच्याकडे सहानुभूतीपुर्वक पाहणे आवश्यक आहे. घरेलू कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था, राज्यकर्ते व समाजाची व संशोधनाची भुमिका महत्वाची असल्याने प्रस्तुत विषयाचे महत्व द्वितीय आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

प्रस्तुत अध्ययनात खालील प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला गेला आहे.
१) घरेलू कामगारांच्या सामाजिक–आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२) कामाच्या ठिकाणच्या समस्या जाणून घेणे.
३) घरेलू कामगारांसाठी असलेल्या योजना, कायदे, सुविधा यांचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे गृहितकृत्ये :**

अध्ययनासाठी खालील गृहितकृत्ये तयार करण्यात आली आहेत.
१) घरेलू कामगारांचे आर्थिक व सामाजिक शोषण होत आहे.
२) मोलकरीण म्हणून काम करण्याचे कारण गरीबी, दारिद्रय आहे.

**संशोधनाचा आराखडा :**

मुंबई व उपनगरातील घरेलू कामगारांच्या समस्या व उपाय या विषयाच्या संशोधनासाठी अन्वेषणात्मक (Exploratory Research Design) संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन विषय** : मुंबई व उपनगरातील घरेलू कामगारांच्या समस्या व उपाय
**तथ्य संकलन :** प्रस्तूत विषयाच्या अध्ययनाकरीता प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाचा वापर करण्यात आला आहे.

**अ) प्राथमिक स्त्रोत :**

मुंबई व उपनगरातील घरेलू कामगारांच्या समस्या व उपाय अभ्यासासाठी मुलाखत अनुसूचीद्वारे (Interview Schedule) माहिती संकलित केली असून यासाठी सहेतूक नमुना निवड पद्धतीचा वापर केला आहे.

### *ब) दुय्यम स्त्रोत :*

संशोधन विषयाचे अध्ययन करताना दुय्यम साधनसामुग्रीमध्ये विविध संदर्भग्रंथ, कामगार कायदे, वर्तमानपत्रे, संशोधनासंबंधी लेख आणि अधिकृत संकेतस्थळावरील उपलब्ध माहिताचा वापर करण्यात आला आहे.

### *सांख्यिकीय तंत्र :*

उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी इत्यादी सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

### *नमुना निवड :*

नमुना निवडताना प्रामुख्याने मुंबई व उपनगर क्षेत्रातील घरकाम करणाऱ्या कामवाली निवडल्या आहेत.

### *निवड घटक :*

मुंबई व उपनगरातील घरेलू कामगारांच्या समस्या व उपाय  अभ्यासाठी एकूण ५० कामवालींची निवड केली आहे.

### *नमुना निवड तंत्रे :*

मुंबई व उपनगरातील घरेलू कामगारांच्या समस्या व उपाय  अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या कामवालींची निवड ‘सहेतूक नमूना निवड’ (Purposive Sampling Method) पद्धतीने करुन प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे संशोधन विषयाची माहिती संकलित करण्यात आली आहे.

### *विषयाची व्याप्ती व मर्यादा :*

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.
१) प्रस्तूत संशोधन हे मुंबई शहर व उपनगरापुरतेच मर्यादित आहेत.
२) सदरील विषयाची व्याप्ती फक्त कामवालींच्या समस्या व कायदेशीर तरतूदी व उपाय योजनाच्या अभ्यासापूरतेच मर्यादीत आहे.
३) सर्वेक्षण कालावधी सन २०१६-१७ हे वर्ष विचारात घेतले आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूचीचा आधार घेतला आहे.

महाराष्ट्र राज्यात २ लाख १३ हजार घरगुती कामगार असून त्यापैकी ६ हजार १०६ कामगारांची सरकार दरबारी नोंद झाली आहे. त्यात प्रामुख्याने महिलांचा समावेश आहे. कोकणात १२६५, औरंगाबाद विभागात १३२३, पुण्यात ४१६०, नागपूरात १४६६ तर नाशिकात ८६५ घरगुती कामगारांची नोंद झाली आहे. या महिलांना कामगार कायदे लागू करण्यासाठी त्यांचा कामगार कायद्याच्या परिशिष्टात अंतर्भाव करण्यात आला आहे. हा विषय किमान वेतन निश्चिती करणाऱ्या समितीपुढे जाणार आहे. या समितीत त्यावर चर्चा होऊन त्याला मंजूरी दिली जाणार आहे. त्यानंतर त्यावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाणार आहे. याशिवाय, आठवी इयत्तेपर्यंत शिकलेल्या घरगुती कामगारांसाठी विशेष कोर्सही सरकारमार्फत दिला जाणार असून त्यासाठीचा ६० टक्के खर्च सरकार करणार असल्याचे सांगितले जाते.

घरेलू कामगार हे कायद्याच्या कोणत्याच भागांमध्ये येत नाहीत. तसेच त्यांना काही लाभ मिळावा. यासाठी महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे की, घरेलू कामगार हे कायद्याच्या एका भागात येतील त्यासाठी एक कायदा बनविला त्या अधिनियमास महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम २००८ असे म्हणतात.

- ***घरेलू कामगारांसाठी असलेल्या योजना :***

### *महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ.*

महाराष्ट्र राज्यातील तमाम घरकामगारांसाठी कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याच्या दृष्टीने डिसेंबर २००८ महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम पारित झाले. त्यानंतर घरकामगार, मालक आणि सरकारचे प्रतिनिधी मंडळाचे सदस्य आहेत. आवश्यकतेनुसार जिल्हा पातळीवर मंडळ स्थापन करण्याची तरतुद आहे.

### *मंडळाची प्रमुख उद्दिष्टये पुढीलप्रमाणे आहेत :*

- कायद्यांतर्गत मिळणाऱ्या लाभांचा उपयोग घेण्यासाठी घरकामगारांची नोंदणी करुन घेणे.
- नोंदीत घरकामगारांना कायद्यांतर्गत मिळणारे लाभ उपलब्ध करुन देणे.
- हे लाभ देण्यासाठी आवश्यक निधी निर्माण करुन त्याचे व्यवस्थापन करणे.
- त्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.

### *महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी प्रक्रिया :*

१८ ते ५६ वयोगटातील घरकामगार नाव नोंदणी करु शकतात.
त्यासाठी जवळच्या कामगार आयुक्त कार्यालयातून नोंदणी अर्ज घेऊन भरुन द्यावा. त्यासोबत पुढील कागदपत्रे जोडावीत.

- ३ पासपोर्ट आकाराचे फोटो
- रहिवासी पुरावा - रेशन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वीजबिल, बँकेतील पासबुकावरील नोंद, पॅन कार्ड, इ. ची झेरॉक्स प्रत.
- वयाचा पुरावा (जन्म तारखेचा दाखला, मनपा उतारा/रेशन कार्ड, इ. ची झेरॉक्स प्रत)
- सध्या ज्यांच्याकडे कामाला आहात त्या मालकांकडून प्रमाण पत्र (हयाचा नमुना अर्जासोबत मिळेल)

अर्जासोबत रु. ३०/- ओळखपत्रासाठी व मंडळाच्या सदस्यतेची वार्षिक वर्गणी रु. ६०/- असे एकूण रु. ९०/- भरावेत व त्याची पावती घ्यावी. पावती जपून ठेवावी. पावतीच्या आधारे ओळखपत्र मिळेल. दर वर्षी रु. ६०/- भरुन सदस्यत्वाचे नुतनीकरण करावे.

*महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाकडून सध्या मिळणारे लाभ :*

१) सर्व नोंदीत घरकामगारांना जनश्री विमा योजनेचा लाभ मिळेल आणि त्यांच्या ९ वी ते १२ वी तल्या पाल्यांना रु. १००/- प्रमाणे मासिक शिष्यवृत्ती देण्यात येईल.
२) मयत घरकामगारांच्या कुटूंबियांना अंत्यसंस्कारासाठी रु. २०००/- दिले जातील.
३) घरेलू कामगार अथवा त्यांच्या पाल्यांच्या व्यवसाय शिक्षणाकरीता प्रशिक्षण दिले जाईल.
४) महिला घरेलू कामगारांना एका प्रसुतीसाठी, पहिल्या दोन अपत्यांपर्यत रु. २०००/- प्रसुति लाभ देण्यात येईल.
भविष्यात नोंदीत घरकामगारांना राष्ट्रीय स्वास्थ्य बिमा योजना/ राजीव गांधी आरोग्यदायी योजनेचे लाभार्थी म्हणून नोंदविण्यात येईल.

*जनश्री बिमा योजना*

*भारतीय जीवन बिमा निगम (एल.आय.सी.) यांच्या सहकार्याने :*

*पात्रता :* १८ ते ५९ वर्ष वयोगटासाठी ही योजना लागू आहे.

*लाभ :* सभासदाचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रु. ३०,०००/- विमा रक्कम नोंदवलेल्या वारसदारांना मिळते. सभासदाचा अपघाती मृत्यू झाल्यास रु. ७५,०००/- विमा रक्कम नोंदवलेल्या वारसदारांना मिळते. अपघातामुळे सभासदाला कायमस्वरुपी अपंगत्व (दोन्ही डोळे, दोन्ही हात, दोन्ही पाय किंवा एक हात आणि एक पाय अक्षम झाल्यास) आले तर रु. ७५,०००/- विमाधारकाला मिळतात. अपघातामुळे सभासदाचा एक डोळा/हात/पाय अक्षम झाल्यास रु. ३७,५००/- विमाधारकाला मिळतात.

*विदेशी भाषा प्रशिक्षण :*

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत विदेशी भाषा शिकविण्याचे वर्ग घेतले जातात. नोंदीत घरेलू कामगारांच्या पाल्यांना विदेशी भाषा शिकता यावी यासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सहकार्याने त्यांना विदेशी भाषा शिकण्याची संधी देण्यात येणार आहे व यावर होणारा खर्च घरेलू कामगार कल्याण मंडळातर्फे करण्यात येणार आहे.

*यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठामार्फत पदविका व पदवी अभ्यासक्रम :*

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठामार्फत घरेलू कामगारांसाठी घरेलू कामगार पदविका अभ्यासक्रम व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठामार्फत घरेलू कामगारांना व त्यांच्या मुलांमुलींना पदवी अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पदविका अभ्यासक्रमासाठी मंडळातर्फे रु. ८००/- व पुर्वतयारी शिक्षणक्रमासाठी रु. ६५०/- मंडळातर्फे देण्यात येणार आहे.

*नवीन योजना :*

मंडळाच्या दि. ०७/०८/२०१३ रोजीच्या बैठकीत दि. ०१/०८/२०१३ रोजी ५५ वर्षे पुर्ण केलेल्या नोंदीत घरेलू कामगारांना सन्मानधन रु. १०,०००/- देण्याचा ठराव करण्यात आलेला आहे.

*निष्कर्ष :*

१)घरेलू कामगार म्हणून काम करणाऱ्या कामगारांत ६८% घरेलू कामगार (मोलकरीण) हया बौद्ध धर्माचे आहेत तर ३०ः घरेलू कामगार हया हिंदू धर्माचे आहेत तर २% घरेलू कामगार हया खिश्चन धर्माचे आहेत. त्याचप्रमाणे ६४% महिला घरेलू कामगार हया अनुसूचित जातीचे आहेत. १४% हया इतर मागासवर्गातील आहेत तर खुल्या प्रवर्गातील २२%महिला घरेलू कामगार आहेत. याचा अर्थ असा की, अनुसूचित जातीमध्ये अजूनही मागासलेपणा असल्याचे दिसून येते. त्यामुळे अनुसूचित जातीच्या कामगारांची स्थिती अधिकच बिकट असल्याचे दिसून येते.

२)अशिक्षित असलेल्या घरेलू महिला कामगार हया १८% आहेत. १ली ते ४ थी पर्यंत शिक्षण झालेल्या १६% महिला घरेलू कामगार आहेत आणि ५ वी ते ७ वी पर्यंतचे शिक्षण झालेले ४२% आहेत तर ८ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण झालेल्या २४% आहेत. यावरुन असे लक्षात या महिला घरेलू कामगारांचा शिक्षणाचा दर्जा खूपच निम्न दर्जाचा आहे. कमी शिक्षण व विशेष कौशल्याचा अभावामुळे त्यांनी घरगुती नोकराच्या स्वरुपात काम करण्याचे ठरविले आहे. शिक्षण कमी असल्यामुळे इतर ठिकाणी कार्यालयात वगैरे नोकरी मिळण्याची शक्यता कमी असल्यामुळे त्यांना मोलकरीण म्हणून काम करावे लागत आहे.

३) वैवाहिक दर्जाबाबतचे स्पष्टीकरण करताना असे आढळून आले की, विवाहीत घरेलू कामगार हया ७०% आहेत आणि अविवाहीत ६% आहेत तर विधवा कामगार हया २४% आहेत. याचा अर्थ असा की विवाह झाल्यानंतर घरातील कुटूंब प्रमुखाचे उत्पन्न कमी असल्यामुळे आणि शिक्षणसुद्धा कमी असल्यामुळे त्यांना दुसऱ्यांच्या घरी घरकाम करावे लागत आहे. त्याचप्रमाणे पतीच्या निधनानंतर घर सांभाळण्यासाठी विधवा कामगारांनाही शिक्षणाच्या अभावामुळे घरकाम करावे लागत आहे. यामध्ये बऱ्याच महिला हया निरक्षर आहेत. निरक्षरतेमुळे व विशेष कौशल्याच्या अभावामुळे त्यांना दुसऱ्यांच्या घरात घरगुती नोकराच्या स्वरुपात काम करावे लागत आहे.

४) ७२% घरेलू कामगार हया स्थानिक आहेत तर २८% घरेलू कामगार हया स्थलांतर करुन आलेले आहेत. स्थलांतर करुन आलेल्या महिला कामगारांना विचारले असता त्यांच्या कडून अशा प्रकारचे उत्तर आले की, मुंबई उपनगरामध्ये जो मोबदला त्यापेक्षा खूप कमी मोबदला त्यांना त्या जेथून आलेले आहेत तेथून मिळते व वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे उदरनिर्वाह करणे मुश्किलीचे बनल्याने आणि काम मिळण्याची शक्यता कमी असल्याने त्यांनी मुंबई उपनगरात काम करण्याचे ठरविले.

५) ४६% घरेलू कामगारांचे स्वतःचे घर आहे. परंतू त्यांचे घर झोपडापट्टी आणि वस्त्यामध्ये आहे. ५०% घरेलू कामगारांचे स्वतःचे घर नाही. यांची तर परिस्थिती अधिकच बिकट आहे. कारण काम करुन जे वेतन मिळते त्यामध्ये त्यांना घरभाडे भरुन आपला जीवनचरितार्थ चालवावयाचा असतो. ४% घरेलू कामगारांचे स्वतःचे घर किंवा भाडयाचेही घर नाही. त्यामुळे त्या जिथे काम करतात तिथेच राहतात.

६) ३८% घरेलू कामगारांनी स्वतःच्या ओळखीने काम मिळविले आहे. २२% कामगारांना दुसऱ्यांच्या मदतीने काम मिळाले आहे तर ३६% कामगारांना एजन्सीकडून काम मिळाले आहे. ज्या कामगारांना एजन्सीकडून काम मिळाले आहे त्यांना काम मिळविण्यासाठी बरीच मोठी रक्कम अदा करावी लागते. काही एजन्सीकडे ठराविक हिस्सा रक्कमेच्या स्वरुपात द्यावी लागते तर काही एजन्सींना महिनाभरात जितके वेतन मिळते तितके एका महिन्याचे वेतन एजन्सींना द्यावी लागते. ही रक्कम जास्त असल्याने त्यांचे आर्थिक शोषण होत आहे.

७) १ घरात काम करणाऱ्या महिला घरेलू कामगारांची संख्या ३४% आहे, २ घरात काम करणाऱ्या कामगारांची संख्या १८% आहे, ३ घरात काम करणाऱ्यांची संख्या २८% आहे, ४ घरात काम करणाऱ्या कामगारांची संख्या १६% आहे. ५ घरात काम करणाऱ्या कामगारांची संख्या ४% आहे. याचा अर्थ असा बहूतांशी महिला कामगारांना एका घरापेक्षा जास्त घरात काम करावे लागते. स्वतःच्या घरचे काम करुन इतर अनेक ठिकाणी काम करावे लागत असल्याने या महिलांचे शारिरीक कष्ट जास्तीचे आहे.

८) एका घरात काम करुन किंवा एकापेक्षा जास्त घरात काम करुन या मोलकरणींना जे वेतन मिळते याचाही विचार करणे आवश्यक आहे. वेतनाच्या बाबतीत अध्ययन करताना असे आढळून आले की, ४% मोलकरणींना ५०० ते ७०० रु. इतके वेतन मिळते, २ः मोलकरणींना १००० रु. इतके वेतन मिळते, १०% मोलकरणींना १५०० रु. इतके वेतन मिळते, १२% मोलकरणींना २००० इतके वेतन मिळते, ४% मोलकरणींना २५०० रु. वेतन मिळते, ८% मोलकरणींना ३००० रु. वेतन मिळते, २०% मोलकरणींना ३५०० रु. वेतन मिळते, ८% मोलकरणींना ४००० रु. वेतन मिळते, १२% मोलकरणींना ४५०० रु. वेतन मिळते, १०% मोलकरणींना ५००० ते ५५०० रु. वेतन मिळते, ६%ः मोलकरणींना ६५०० रु. वेतन मिळते तर ४% मोलकरणींना १२००० इतके वेतन मिळते. यावरुन असे लक्षात येते की, जवळपास ८०% महिला मोलकरणींना अत्यंत अल्प वेतन मिळते. यावरुन असे स्पष्ट होते की, ८०ः मोलकरणींचे आर्थिक शोषण होत आहे.

९) घरेलू नोकरांच्या काम करण्यांचा कारणांचा अध्ययन करताना असे आढळून आले की, ४२% मोलकरणींचे काम करण्याचे कारण हे गरीबी आहे. शिक्षण कमी असल्यामुळे १६% मोलकरणींना काम करावे लागत आहे. घरातील सदस्यांचे उत्पन्न कमी असल्यामुळे २४% मोलकरणींना काम करावे लागत आहे. गरीबी व घरातील सदस्यांचे उत्पन्न कमी असल्यामुळे २% मोलकरणींना काम करावे लागत आहे. गरीबी, दारिद्रय आणि शिक्षण कमी असल्यामुळे ६% मोलकरणींना काम करावे लागत आहे. गरीबी व शिक्षण कमी असल्यामुळे ६% मोलकरणींना काम करावे लागत आहे. गरीबी, शिक्षण कमी व घरातील सदस्यांचे उत्पन्न कमी असल्यामुळे २% मोलकरणींना काम करावे लागत आहे. दारिद्रय आणि शिक्षण कमी असल्यामुळे २% मोलकरणींना काम करावे लागत आहे. याचा अर्थ बहूतांशी घरगुती कामगार हया गरीबीमुळे काम करत आहेत म्हणजेच गरीबी हे काम करण्याचे मुख्य कारण आहे.

१०) काम करताना मिळणाऱ्या वेतनात काही सुधारणा व्हावेसे वाटते का याविषयी मोलकरणींना प्रश्न विचारले असता जवळपास ६६% मोलकरणींनी वेतनात सुधारणा व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. म्हणजेच काम करताना मिळणारे वेतन हे खूप कमी असल्यामुळे त्यांना वेतनात सुधारणा व्हावी असे वाटत आहे. २% मोलकरणींनी वेतनात सुधारणा होण्याची आवश्यकता नाही असे उत्तर दिले.

११) ज्या मोलकरणींना वेतनात सुधारणा व्हावी असे वाटते त्याचे अध्ययन करताना असे आढळून आले आहे की, ३०% मोलकरणींना नियमित वेतनात सुधारणा व्हावी असे वाटते, ४६% मोलकरणींना वर्षात एकदा वाढ व्हावी असे वाटते, १६% मोलकरणींना बोनसमध्ये वाढ व्हावी असे वाटते, २% मोलकरणींना वर्षात एकदा वाढ हवी आणि बोनसमध्येही वाढ व्हावी असे वाटते, २% मोलकरणींना बोनस मध्ये वाढ व्हावी व सणासाठी ॲडवान्स द्यावे असे वाटते.

१२) जेव्हा घरेलू कामगार हया आजारी पडतात तेव्हा कामाच्या ठिकाणी कसे मॅनेज करतात याविषयी प्रश्न विचारले असता असे

आढळून आले की, ६२% मोलकरणी हया सुट्टी घेतात, १६% मोलकरणी हया घरातील इतर व्यक्तींना कामाच्या ठिकाणी पाठवतात, २२% मोलकरणींचे कामावर न आल्यामुळे पगार कापले जाते.

१३) घरेलू कामगारांना कामाच्या ठिकाणी नाष्टा, जेवण आणि रात्रीचे जेवण मिळते का असे विचारले असता असे आढळून आले की, ३६% मोलकरणींना कामाच्या ठिकाण नाष्टा, जेवण मिळते तर ४८% मोलकरणींना कामाच्या ठिकाणी नाष्टा, जेवण मिळत नाही तर १६% मोलकरणींना कधीतरी चहा किंवा नाष्टा मिळतो.

१४)घरेलू कामवालींना ठरल्याप्रमाणे सुट्टी मिळते का याबाबतीत प्रश्न विचारले असता असे आढळून आले की, ७२% कामवालींना ठरल्याप्रमाणे सुट्टी मिळते तर ७% कामवालींना ठरल्याप्रमाणे सुट्टी मिळत नाही आणि ७% कामवालींना कधीतरी सुट्टी मिळते.

१५)घरेलू कामगारांच्या हातून काही चूका झाल्यास मालक वर्गाचे वर्तन कशा पद्धतीचे आहे याबाबत प्रश्न विचारले असता असे आढळून आले की, ८% मोलकरीर्णींनीसोबत दुर्व्यवहार केले जाते, ७२% मोलकरणींना माफ केले जाते आणि २०% मोलकरणींचे पगार कापले जाते.

१६) घरेलू कामगार म्हणून काम करताना काय अनुभवले याबाबत प्रश्न विचारले असता असे आढळून आले की, १६% मोलकरणींनी उशीरा पगार मिळत असल्याचे अनुभवले, २०% मोलकरणींनी पगार कापत असल्याचे अनुभवले, ७% मोलकरणींनी जेव्हा सुट्टी हवी असते तेव्हा मिळत नसल्याचे अनुभवले, १८% मोलकरणींनी उशिरा पगार मिळणे, पगार कापणे व सुट्टी जेव्हा हवी असणे तेव्हा मिळत नसल्याचे अनुभवले आहे.

१७)घरेलू कामवालींना पुढेही काम चालू ठेवणार का याबाबत प्रश्न विचारले असता असे अनुभवले की, जवळपास ८६% कामवालींना अशा प्रकारचे काम पुढेही करण्याची इच्छा नाही. तर १४% कामवालींनी पुढेही अशाच प्रकारचे काम करणार असल्याचे सांगितले. याचा अर्थ असा की, जवळपास ८६% मोलकरणी हया मजबूरीने काम करत आहेत त्यांना या परिस्थितीतून बाहेर यावेसे वाटते. परंतू गरीबी, दारिद्रय, कमी शिक्षण वगैरे कारणामुळे त्यांना मजबूरीवश काम करावे लागत आहे.

१८) घरेलू कामवालींना त्यांच्या मुलांच्या भविष्याबाबत काय वाटते याबाबत प्रश्न विचारला असता असे आढळून आले की, ३५% कामवालींना मुलांना चांगले शिक्षण देण्याची इच्छा आहे. ५% कामवालींना आपल्या मुलांना चांगली नोकरी मिळावी असे वाटते जेणेकरुन त्यांची गरीबी कमी होईल. ३% कामवालींना आपल्या मुलींचे चांगल्या कुटूंबात व्हावे असे वाटते.

१९) घरेलू कामगारांच्या वयासंबंधीचे अध्ययन करताना असे आढळून आले आहे की, जवळपास १५% मोलकरणींचे वय हे ५० वर्षे आणि ५५ वर्षापेक्षा अधिक आहे. घरची गरीबी व दारिद्रयता यामुळे त्यांना यावयातही काम करावे लागत आहे. त्यामुळे शासनाने याबाबत गांभिर्याने विचार करणे आवश्यक आहे.

२०)घरेलू कामवालींना परिस्थिती सुधारण्यासाठी काय प्रयत्न केले गेले, कोणी मदत केली का, कोणी मार्गदर्शन केले आहे का, स्वयंसेवी संस्थांनी मदत केली आहे का आणि शासनाच्या योजना/कायदे माहित आहेत का याबाबत प्रश्न विचारले असता असे आढळून आले की, जवळपास ९८% कामवालींना कोणी मदत केली नाही, मार्गदर्शन केले नाही आणि शासनाच्या योजना/कायदे माहित नाहीत. याावरुन असे लक्षात येते या घरेलू कामगारांकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले जाते. जेव्हा समाजात यांचा मोठा हिस्सा काम करत आहे.

२१) घरेलू कामगार म्हणून कोठे नोंदणी केली आहे का याबाबत प्रश्न विचारले असता असे आढळून आले आहे की जवळपास सर्वच घरेलू कामगारांनी कोठेही कामगार म्हणून नोंदणी केली नाही. याचा अर्थ असा की, या घरेलू कामगारामध्ये जनजागृतीची मोठया प्रमाणात आवश्यकता आहे.

### *शिफारशी :*

१) घरगुती काम व्यवसायाच्या समस्याचे एकदम निवारण करणे शक्य नाही. यासाठी धोरणात्मक बदल करण्याची व घरगुती कामगारांबाबत आराखडा तयार करण्याची, योजना तयार करण्याची आवश्यकता आहे.

२) घरगुती कामगारांच्या बहिष्कारांना सुधारण्यासाठी रोजगार आणि श्रम कायद्यामध्ये अधिनियम बनविण्याची आवश्यकता आहे. यामध्ये न्युनतम मजूरी, अतिरिक्त कामाचा मोबदला, विश्रांतीच्या कालावधी, कामाचे वातावरण सुरक्षित व स्वास्थकर असणे, शोषणाविरुद्ध संरक्षण, सवेतन सुट्टया, मेडीकल सुट्टया, प्रसुतीच्या सवेतन सुट्टया, कामाची शाश्वती वगैरे बाबी असणे आवश्यक आहे.

३) घरगुती काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या अधिकारांबाबत शिक्षित, जागरुक करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मालक व कामगारांमध्ये करार होणे आवश्यक आहे. यामध्ये जादा कामाचा मेहनताना, नियमित वेतन, प्राथमिक वैद्यकिय सुविधा, सुरक्षित निवृत्ती वेतन, सवेतन सुट्टया, सुरक्षित वातावरण वगैरे बाबी करारात स्पष्ट केल्या पाहिजेत.

४) घरेलू कामगारांना मेडीकल रजा, प्रसुती सवेतन रजा व पुन्हा कामाची शाश्वती, कामगारांची गुणवत्ता सुधारण्यात संधी देण्यात यावी.

५) काही ठिकाणी एजन्सीकडून घरेलू कामगारांना कामावर लावले जाते. हया एजन्सी 'दलाल' सारखे काम करतात. घरेलू कामगारांकडून काम लावण्याच्या मोबदल्यात व मालकांकडून नोकर देण्याच्या मोबदल्यात खूप मोठी रक्कम घेत असतात. यामध्ये घरेलू कामगारांकडून जी रक्कम घेतात ती रक्कम कमी असावी किंवा त्यांच्याकडून पैसा घेऊ नये.

६) असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे अधिकार व सामाजिक सुरक्षा अधिकाराचे रक्षण करण्यासाठी महिना पगारावर काम करणाऱ्या

कामगारांना नेमणूक पत्र (अपॉइंटमेंट लेटर) देण्याची तरतूद असावी. घरगूती नोकर हे 'मदतनिस' नसून ते एम्लाईड वर्कर असल्याचा शिक्कामोर्तब करावा. त्यामुळे त्यांना कामगारांचे सर्व अधिकार प्राप्त होतील.
७) स्थानिक आर्थिक स्थितीनुसार दरपत्रक तयार करुन घरेलू कामगारांना वेतन देण्यात यावे.
८) ६० वर्षावरील घरेलू कामगारांना निवृत्ती पेन्शन योजना मिळावी.
९) लाभार्थी कार्डधारक मोलकरणींना महिना किमान ३ हजार रु. पेन्शन मिळावी. म्हणून शासनाने त्यांना लाभार्थि कार्ड द्यावे.
१०) घरेलू कामगारांचे सर्वेक्षण करण्यात यावे. जेणेकरुन ते घरगुती कामगार म्हणून नोंदणी करतील. त्याचबरोबर मालकवर्ग व घरेलू कामगार या दोघांचे मते जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

*संदर्भसूची :*

१)मजदूर बिगूल वृत्तपत्र, 'घरेलू कामगार स्त्रियॉं : हक से वंचित एक बडी आबादी दि. १६ नोंव्हेबर २०१४.
२) http://blog.ranacomarine.com/tags 'कामगाराला अपॉइंटमेंट लेटर दिले का' दि. २७ जुलै, २०१५.
३)पत्र सुचना कार्यालय, भारत सरकार, http://pibmumbai.gov.in/scripts 'देशांतील घरगुती कामगार' दि. ७ जुलै २०१४. नवी दिल्ली.
४) किरण मोघे, 'श्रमिक संवाद' सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू), पुणे.
५) प्रतिनिधी http://navshakti.co.in/mumbai/132767/ 'घरगुती कामगारांना किमान वेतन देण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात' दि. २८ मुंबई

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org